राज्यातील दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१००/आस्था-८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक:- १२ जून, २०२६.

**प्रस्तावना:-**

दुय्यम कारागृहांसंदर्भात कार्यवाही करण्यापूर्वी दुय्यम कारागृहांच्या सद्यःस्थितीचा अभ्यास करण्यासाठी गृह विभाग, शासन निर्णय दि.१७/१०/२०२३ अन्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली होती. सदर अभ्यासगटाने अंतिम अहवाल दि.१०/१२/२०२४ रोजी सादर केला होता. दुय्यम कारागृहांचे महसूल विभागाकडून गृह विभागाकडे हस्तांतरणासंदर्भात गठित अभ्यासगटाच्या अहवालावर धोरणात्मक निर्णय घेण्यासंदर्भात अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, व अ.मु.स.(अ.व सु.), गृह विभाग यांची संयुक्त बैठक दि.०५/०१/२०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये चर्चेअंती दुय्यम कारागृहांच्या हस्तांतरणाबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला :-

१. राज्यातील दुय्यम कारागृहे ही सद्यास्थितीत महसूल विभागाच्या नियंत्रणाखाली आहेत. आज एकूण ११६ दुय्यम कारागृहांपैकी केवळ ३६ कार्यरत असून ८० बंद अवस्थेत आहेत. कार्यरत कारागृहांची दुरावस्था आहे. दुय्यम कारागृहांच्या संदर्भात अभ्यास करुन निर्णय घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या शिफारसी विचारात घेऊन, महसूल विभागाच्या अधिनस्त असलेली सर्व दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्यात यावीत.
२. दुय्यम कारागृहांच्या कार्यान्वयन व व्यवस्थापन खर्चासाठी अस्तित्वात असलेले लेखाशिर्ष तसेच दुय्यम तुरुंग नियमपुस्तिका, १९५२ बंद / व्यपगत करणेबाबत रितसर कार्यवाही करण्यात यावी.
३. आवश्यकतेनुसार कैद्यांची रवानगी नजिकच्या जिल्हा कारागृह वर्ग-३ मध्ये करण्यात यावी.
४. बैठकीत झालेल्या उपरोक्त निर्णयांच्या अनुषंगाने गृह विभागाने तातडीने आपले अभिप्रायांसह प्रस्ताव महसूल विभागास सादर करावेत.

२. अपर मुख्य सचिव (महसूल), यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५/०१/२०२६ रोजी घेतलेले निर्णय तसेच याअनुषंगाने गृह विभागाचे अभिप्राय विचारात घेता, राज्यातील दुय्यम कारागृहे बंद करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील दुय्यम कारागृहे बंद करणेबाबत अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५/०१/२०२६ रोजी पार पडलेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने गृह विभागाने दिलेले अभिप्राय लक्षात घेता, राज्यातील दुय्यम कारागृहे बंद करणेबाबत या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत:-

१. महसूल विभागाच्या अधिनस्त असलेल्या एकूण ११६ दुय्यम कारागृहांपैकी केवळ ३६ कार्यरत असून ८० बंद अवस्थेत आहेत. कार्यरत असलेली दुय्यक कारागृहे देखील सुस्थितीत नाहीत. त्यामुळे सदरची दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्यात येत आहेत.

२. सदर दुय्यम कारागृहांसाठी गृह विभागाची लिपिक संवर्गातील (वर्ग-३) एकूण ६ पदे मंजूर आहेत. सदर पदे श्रीरामपूर (अहिल्यानगर), महाड (रायगड), मालेगाव (नाशिक), तळोदा (नंदुरबार), कराड (सातारा), उदगीर (लातूर) या ठिकाणी कार्यरत असून, सद्यस्थितीत ती रिक्त आहेत. सदर पदे ही संबंधित कारागृह उपमहानिरीक्षक कार्यालयास वर्ग करण्याची कार्यवाही गृह विभागाने करावी.

३. सदर दुय्यम कारागृहासाठी "मागणी क्र.बी-५ मुख्य लेखाशिर्ष २०५६, तुरुंग, १०१, तुरुंग, (००) (०३) तुरुंग (अनिवार्य) २०५६ ००५३ अंतर्गत ०१, वेतन, ०६, दुरध्वनी, वीज व पाणी शुल्क, १०, कंत्राटी सेवा, ११, देशांतर्गत प्रवास खर्च, १३, कार्यालयीन खर्च, १७, संगणक खर्च, १९, आहार खर्च व ५०, इतर खर्च या विविध उद्दिष्टाखाली गृह विभागामार्फत तरतूद अर्थसंकल्पित करुन खर्च करण्यात येतो. पुढील आर्थिक वर्षापासून २०५६ ००५३ हे लेखाशिर्ष बंद करणेबाबत गृह विभागाने वित्त विभागास विनंती करावी.

४. दुय्यम तुरुंग नियमपुस्तिका, १९५२ ही बंद/ रद्द करण्यात येत आहे.

५. दुय्यम कारागृहामध्ये सद्यस्थितीत दाखल असलेले कैदी हे संबंधित दुय्यम कारागृह असलेल्या जिल्ह्यातील जिल्हा/मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्याबाबत गृह (कारागृह) विभागानी कार्यवाही करावी.

२. सदर शासन निर्णय, गृह विभाग, अनौ.संदर्भ क्र.०१, दि.११/०६/२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०६१२१२१९३४९५१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D36A0A6455652C60EA76104DD537113A9CA67AB14A315B9CEFC36FC9BE2915F8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=704CB545C50221B15CDE7CCB8854E694C765DFB3A0240E891EBFB56EE79E3440, cn=AJIT SOPANRAO DESHMUKH
Date: 2026.06.12 12:20:29 +05'30'

**( अजित देशमुख )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मंत्री ( महसूल ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, ( महसूल ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. अ.मु.स. ( महसूल ) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय,मुंबई-३२
४. मा.अ.मु.स. (अ. व सु.) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, पुणे.
६. श्री.विजय राघवन, प्रोफे, TISS
७. श्री.हर्षद मि.अहिरराव, अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह.
८. निवड नस्ती (आस्था-८),